# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, १३२.बी. भोसलेनगर, पुणे -४११ ००७.

दुरध्वनी क्रमांक / फॅक्स : 020-25510419/519 ई-मेल : mauebpune@yahoo.co.in


जा.क्र.मकृविपमंपुणे/बातमी/परीक्षा/४०४/२२ दि.०३.०३.२०२२

## बातमी प्रसिध्दीसाठी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्या शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी **"पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२२"** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत **दि.११.०६.२०२२ ते दि.१३.०६.२०२२** या कालावधीत महाराष्ट्रातील १७ केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदवीधर आणि सन् २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम वर्षातील पदवी परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचणे गरजेचे आहे. **ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याचा कालावधी दि.०४.०३.२०२२ ते दि.२८.०३.२०२२असा राहील.ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑनलाईन बॅकींग(नेटबॅकींग) डेबिट/क्रेडीट कार्डव्दारे दि.०४.०३.२०२२ (दुपारी १२.००) पासून दि.३१.०३.२०२२ (दुपारी १२.००) तारखेपर्यंत स्वीकारले जाईल.** ह्या परीक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. अंतिम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तद्नंतर संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेशपत्र वरील संकेतस्थळावरुन दि.०३.०६.२०२२ पासून स्वतः प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

उत्तराची नमुना पत्रिका दि. २०.०६.२०२२ व परीक्षेचा निकाल दि. २७.०६.२०२२ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८११९/०२०-२५५२८५१९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे डॉ. अमोल मा. देठे, नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

दिनांक : ०३.०३.२०२२
स्थळ : पुणे

**नियंत्रक**
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे
(मो.नं. ७५८८६११०२५)